# जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
# रेती/वाळू लिलावाकरिता ई-निविदा व ई-ऑक्शन सूचना

---

**जा.क्र.2018/महसूल/गौ.ख./प्र.क्र./405** **दिनांक 28/02/2018**

शासन, महसूल व वन विभाग निर्णय क्र.गौखनि 10/0615/प्र.क्र.289/ख, दिनांक 3 जानेवारी 2018 व महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,2013 मधील नियम 70 मधील तरतुदीनुसार दरवर्षी जिल्ह्यातील शासकीय रेती गटांची निर्गती लिलावाद्वारे करावयाची आहे.

**2.** त्यानुसार, **जिल्हास्तरीय पर्यावरण आघात व्यवस्थापन प्राधिकरण (DEIAA) जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती (DEAC) यांनी मान्यता दिलेल्या तसेच मा.राष्ट्रीय हरीत न्यायाधिकारण, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या मुळ अर्ज क्र.363/2014 व 366/2015 ते 368/2015 मधील अंतिम आदेशाच्या/निर्णयाच्या तसेच राज्य शासनाच्या पुढील निर्देशाच्या अधीन राहुन जिल्हास्तरीय 30 व सयुक्त परभणी-हिंगोली 2 असे एकूण 32 वाळू गटातील 11 वाळु गटासाठी पहिली फेरी तसेच 21 वाळु गटा साठी दुस-या फेरीसाठी** ई- निविदा व ई- ऑक्शनद्वारे लिलाव करण्यात येत आहेत. वाळू लिलावाच्या अटी/शर्ती, वाळू गटाची हातची किंमत व ईतर सर्व माहिती गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी, जिल्ह्यातील सर्व तहसिलदार/उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात तसेच https://maharashtra.etenders.in व http://e-auctions.in आणि www.parbhani.nic.in या वेबसाईट/ संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

**3.** ई-निविदा(e-tendering) व ई लिलाव(e-auction) प्रक्रियेत भाग घेणा-यांना वैध डिजिटल सिग्नेचर आवश्यक राहील. नव्याने डिजिटल सिग्नेचर मिळविण्याकरिता पॅनकार्ड, वाहन परवाना, पासपोर्ट साईजचा फोटो यांच्या हार्ड कॉपीज सक्षम प्रमाणीकरण प्राधिकरणास (Certifying Authority) सादर करुन डिजिटल सिग्नेचर मिळविता येईल.

**4.** वाळु लिलावाची प्रक्रिया ही ई-निविदा(e-tendering) व ई ऑक्शन(e-auction) या दोन्ही प्रक्रियांद्वारे राबविली जाईल. ई-निविदा (e-tendering) प्रक्रीयेत भाग घेत असताना संबंधिताने https://maharashtra.etenders.in व http://e-auctions.in या वेबसाईटवर ई-निविदा खरेदी करावी. ई-निविदा खरेदी करण्यासाठी वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल नंबर, पॅनकार्ड, GST विभागात नोंदणी केलेला नोंदणी क्रमांक, करारपत्र/प्रतिज्ञा पत्र, मागील वर्षाचे आयकर व विक्रीकर विवरणपत्र, रहिवाशी दाखला, कंपनी/फर्म असल्यास रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र इत्यादि कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच ई-निविदा भरत असताना अर्ज फी Debit Card/Credit Card/Net Banking या माध्यमातुन व अनामत रक्कम Debit Card/Credit Card/Net Banking/NEFT/RTGS या माध्यमातुनच जिल्हाधिकारी, परभणी यांचे खात्यावर जमा करणे आवश्यक आहे.

**5.** ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10,00,000/-(अक्षरी रुपये दहा लाख) व त्यापेक्षा जास्त असेल अशा वाळू गटासाठी अर्ज फी रु.5,000/-(रुपये पाच हजार फक्त) ऑनलाईन भरावी लागेल. ज्या वाळू गटासाठी हातची किंमत रुपये 10,00,000/-(अक्षरी रुपये दहा लाख) पेक्षा कमी असेल अश्या वाळू गटासाठी अर्ज फी रुपये 2,000/-(रुपये दोन हजार फक्त) ऑनलाईन भरावी लागेल.

**6.** लिलावासाठी प्रसिध्द केलेल्या वाळूगटाच्या हातच्या किंमतीवर भरावयाची अनामत रक्कम निश्चित केली आहे व ती प्रसिध्द केलेली आहे. अनामत रक्कम Debit Card/Credit Card/Net Banking/ NEFT/RTGS या माध्यमातुनच जिल्हाधिकारी,परभणी यांचे ICICI बँक खात्यावर जमा करणे आवश्यक आहे.

**7.** E-tendring च्या बोलीच्या कालावधीत संबंधितास त्यांची बोली अपलोड करता येईल. हा कालावधी संपल्यानंतर दिलेल्या मुदतीत Bid Submission Service Provider fee रु.750+GST+applicable payment gateway charges Debit Card/Credit Card/ Net Banking द्वारे Nextenders India Pvt.Ltd. यांचे खात्यामध्ये जमा करावी व Online Bid Submission Stage पूर्ण केल्यानंतरच त्यांची ई-निविदा (e-tendering) जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत सादर होईल.

**8.** E-tendering च्या प्रक्रीयेमध्ये टेक्नीकल बीड ओपनिंग (Technical Bid Opening) चा दिनांक व वेळ नमुद केलेली आहे. Technical Bid उघडल्यानंतर नियोजित वेळापत्रकानुसार ई-ऑक्शन (e-auction) प्रक्रिया सुरु होईल. ज्यांना ई-ऑक्शनमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांना http://e-auctions.in या Website वर जाऊन ऑनलाईन बोली टाकता येईल. त्यापुर्वी त्यांना Service Provider fee रु.1000/-+GST+applicable payment gateway charges (प्रति रेतीगट) Debit Card/ Credit Card/Net Banking द्वारे भरणा करावी लागेल.

**9.** टेक्नीकल बीड ओपनींग(Technical Bid Opening) नंतर ज्या व्यक्तीची कागदपत्रे परिपूर्ण असतील तेच ई-निविदाधारक पुढील प्रक्रियेसाठी पात्र राहतील. जे ई-निविदाधारक टेक्लीकल बीड ओपनींगमध्ये पात्र राहतील अशाच ई-निविदाधारकांना ई-ऑक्शन(e-auction) मध्ये भाग घेता येईल. ई-ऑक्शननंतर दिनांक व वेळ नमुद केल्याप्रमाणे प्राईस बीड ओपन(Price Beed Open) करण्यात येईल.

**10.** ज्यांना एकापेक्षा जास्त गटासाठी ई-निविदा व ई-ऑक्शनमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी प्रत्येक गटनिहाय स्वतंत्रपणे अर्ज फी व अनामत रक्कम, Service Provider fee जमा करणे आवश्यक राहील. या रक्कमा स्वतंत्रपणे वर नमुद केलेल्या पध्दतीने जमा कराव्यात. एकत्रित रक्कम जमा करु नये. तसेच प्रत्येक गटासाठी आवश्यक कागदपत्रे स्वतंत्रपणे अपलोड करावीत.

**11.** तसेच ज्यांना एकाच वाळू गटासाठी ई-निविदा तसेच ई-ऑक्शन या दोन्ही प्रक्रियांमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांना त्याच वाळू गटासाठी ई-टेंडरींग नंतर ई-ऑक्शनसाठी अनामत व अर्ज फी पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही. परंतु, त्यांना Service Provider fee गटनिहाय रक्कम रुपये 1000/-+GST+applicable payment gateway charges Debit Card/Credit Card/Net Banking द्वारेच Nextenders India Pvt.Ltd. यांचे खात्यामध्ये लॉग इन करताना जमा करावी लागेल.

**12.** ई-ऑक्शनसाठी किमान बोली ही रेती घाटाच्या हातच्या किंमतीच्या अधिक रक्कमेसाठी संबंधितास लावावी लागेल. प्रथम बोलीकरिता 45 मिनिटांचा अवधी देण्यात येईल. दिलेल्या 45 मिनिटांपैकी

शेवटच्या 10 मिनिटात कोणी बोली वाढविल्यास लिलावधारकास Auto Extention पध्दतीने 15 मिनिटांचा अवधी वाढून मिळेल. वाढीव 15 मिनिटांपैकी शेवटच्या 05 मिनिटात कोणी बोली लावल्यास Auto Extention System नुसार लिलावधारकास आणखी 15 मिनिटांचा अवधी मिळून सदरची प्रक्रिया अविरत (continue) सुरु राहील. सुरुवातीच्या 45 मिनिटात तसेच वाढीव 15 मिनिटांच्या अवधीत कोणतीही बोली प्राप्त न झाल्यास E Auction System Block होईल. त्यानंतर E Tender उघडून सर्वोच्च बोलीधारक निश्चित करण्यात येईल.

**13.** ई-ऑक्शनमध्ये किमान रुपये 10,000/- व त्याच्या पटीतच बोली लावता येईल. संगणकीय प्रणालीमध्ये एक बॉक्स दिसेल त्यामध्ये 1 ते 100 आकडे असतील. तेथे संबंधीत आकड्याच्या दहा पटीने बोली वाढविता येईल. उदा.20 आकडा निवडल्यास रुपये 2,00,000/- ची बोली लावता येईल. ई-ऑक्शन प्रक्रिया थांबविल्यानंतर/सपंल्यानंतर दुस-या दिवशी सदर वाळुघाट ई-ऑक्शनमधील सर्वोच्च किंमत जाहीर केली जाईल.

**14.** वाळू लिलावासंबंधीचा तारीखनिहाय तपशिल https://maharashtra.etenders.in व http://e-auctions.in आणि www.parbhani.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**15.** सर्वोच्च ई-निविदा व ई-लिलावधारकाने विहित मुद्रांक शुल्क, सुरक्षा ठेव, पर्यावरण शुल्क, जमा केल्यानंतर करारनामा करण्यात येईल. तसेच वस्तु व सेवाकर विभागाने निश्चीत केलेले GST शुल्क अदा करावे लागेल.

**16.** ई-निविदा व ई-लिलावधारकास गौण खनिजाबाबत शासन निर्णय, दिनांक 12.01.2018 मधील सर्व तरतुदी, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,2013 तसेच पर्यावरण विषयक अनुमतीमध्ये नमुद व वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

**17.** ई-निविदा(e-tendering) अथवा ई-ऑक्शन(e-auction) स्विकारण्याचे वा नाकारण्याचे तसेच तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पुढे ठेवण्यासंबंधीचे अधिकार जिल्हाधिकारी, परभणी यांनी राखून ठेवले आहेत.

**18.** ई निविदा/ई ऑक्शनच्या तांत्रीक बाबीसाठी support.gom@nextenders.com या ई-मेल आयडी व दुरध्वनी क्रमांक 020-25315555 वर संपर्क करावा. तसेच कार्यालयीन बाबीविषयी श्री.पारीतोष मंजूरे- 8879656081 जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी श्रीमती विदया खरबडकर (मोबाईल क्रमांक 7218655211) व अवल कारकून म.अजिम (मोबाईल क्रमांक 9404071996) वर संपर्क साधावा.

**19.** ई निविदा व ई ऑक्शन पध्दतीने रेती/वाळू लिलाव करणेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चीत करण्यात आले आहे.

| E-Tender and E-Auction Schedule for Parbhani Collector Office | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | Stage | Start Date | Time | End Date | Time |
| 1 | Tender Release | 1/03/2018 | 14.00 | 1/03/2018 | 23.00 |
| 2 | Tender Download | 1/03/2018 | 23.01 | 6/03/2018 | 17.30 |
| 3 | Bid Preparation | 1/03/2018 | 23.01 | 6/03/2018 | 17.30 |
| 4 | Close for Technical | 6/03/2018 | 17.31 | 7/03/2018 | 15.00 |
| 5 | Close for Price Bid | 6/03/2018 | 17.31 | 7/03/2018 | 15.00 |
| 6 | Bid Submission | 7/03/2018 | 15.01 | 8/03/2018 | 15.01 |
| 7 | Technical Bid Opening | 8/03/2018 | 15.02 | 9/03/2018 | 23.00 |
| 8 | e-Auction | 10/03/2018 | 11.00 | Till Process Complete | |
| 9 | Price Bid Opening | 10/03/2018 | | | Till Process Complete |

**नोटः-** e-Auction प्रक्रिया संपल्यानंतर Tender Price Bid उघडून सर्वोच्च बोलीधारक निश्चित करण्यात येईल.

## <u>परभणी जिल्हयातील वाळु लिलाव सन 2017-18 अटी व शर्ती</u>

1. वाळु/रेती गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या हाताची किंमतीपेक्षा (Upset price) अधिक रकमेने लिलावाच्या बोलीची सुरुवात करण्यात यावी.
2. लिलावातील / निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारवयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय प्रकरणपरत्वे अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी किंवा सथास्थिती विभागीय आयुक्त यांनी घ्यावयाचा असून, सदर निर्णय संबंधितास लिलावाच्या दिवशीच कळविणे आवश्यक राहील. निविदा नाकारावयाचा निर्णय घेतल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदविण्यात यावी.
3. ई-निवीदा/ई-ऑक्शनद्वारे लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला, ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10,00,000/- पेक्षा कमी असेल त्या वाळू गटाकरिता हातच्या किंमतीच्या 20% व ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10,00,000/- पेक्षा जास्त असेल त्या वाळू गटाकरिता रुपये 3,00,000/- किंवा हातच्या किंमतीच्या 20% रक्कम यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम [EMD] म्हणुन नेट बँकींगद्वारे District Mining Officer Parbhani यांचे ICICI बँक खात्याध्ये उपरोक्त नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन जमा करावी लागेल.
4. लिलावाच्या जाहिरातीमध्ये नमूद वाळू / रेती स्थळात अपेक्षीत वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रित आहे

किंवा कसे याची लिलावापूर्वी खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहील. वाळू / रेती गटाचा ताबा घेउन लिलावधारकाने वाळूचे उत्खनन केल्यानंतर यासंबंधीची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही तसेच वाळूगट बदलून देण्याची किंवा वाळू लिलावापोटी शासन जमा केलेल्या रकमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करण्याचा विनंतीचा विचार केला जाणार नाही.

5. ई निवीदा/ई ऑक्शनमधील संबंधीत वाळुगटाची सर्वोच्च किंमत स्विकारल्यानंतर त्यापैकी 1/4 (25%) रक्कम शासन खात्यामध्ये त्याच दिवशी जमा करावी लागेल.
6. सर्वोच्च किंमतीपैकी उर्वरीत 3/4 (75%) रक्कम 15 दिवसांत एक रकमी भरावी लागेल. सदरची रक्कम जमा करण्याच्या हमीचे दायीत्व स्वीकारणा-या दोन व्यक्तीसह लिलावधारकास स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टँप पेपर) कागदावर शपथपत्र त्वरित करुन दयावे लागेल. असे शपथपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली 1/4 (25%) रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत वाळुगटाचा फेर लिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे शपथपत्र दाखल न केल्याच्या परिणामी निवीदा/ लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही.
7. फेरलिलाव किंवा नव्याने लिलाव केल्यास पुर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पुर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापी, फेरलिलावात पुर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक किंमत आल्यास त्यावर पुवीच्या लिलावधारकाचा हक्क राहणार नाही.
8. लिलावधारकाने लिलावाची उर्वरीत रक्कम 15 दिवसात न भरल्यास त्याला संपुर्ण राज्यासाठी काळया यादीत टाकुन कोणत्याही जिल्हयात लिलावात भाग घेण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल.
9. आयकर अधिनियमातील तरतूदीनुसार लिलावातील सर्वोच्च किंमतीच्या अनुषंगाने टीडीएस देणे लिलावधारकास बंधनकारक राहील. तसेच त्यांना वस्तू व सेवा कर खात्याकडे नियमानुसार वस्तू व सेवा कर शासन जमा करणे बंधनकारक राहील.
10. लिलावधारकास रुपये 5000/- (रुपये पाच हजार) इतक्या रकमेचा उपसंचालक महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, औरंगाबाद यांच्या नावे काढण्यात आलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी,डी,) सर्वेक्षण शुल्कापोटी जमा करावा लागेल.
11. तसेच 27 मार्च 2015 रोजी अधिसूचीत झालेल्या खाण व खनिजे (विकास व नियमन) संशोधित अधिनियम-2015 नुसार सर्वोच्च बोलीच्या 10 % रक्कम ना परतावा जिल्हा खनिज प्रतिष्ठान परभणी, या नावाने राष्ट्रीयकृत बैकेचा डि.डि. जमा करावा लागेल
12. लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रुपये 3,00,000/- (रुपये तीन लाख फक्त) किंवा हातच्या किंमतीच्या 20% यापैकी जी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. परंतु, ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये

10,00,000-/ (रुपये दहा लाख फक्त) पेक्षा कमी असेल त्या वाळू गटासाठी हातच्या किंमतीच्या 20% रक्कम अनामत म्हणुन भरावी लागेल. ही रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

13. लिलावधारकास पर्यावरण शुल्कापोटी, सर्वोच्च किंमतीच्या 2% रक्कम ही बँक गॅरंटीच्या स्वरुपात पर्यावरण शुल्क म्हणून दयावी लागेल. लिलावातील अटी/शर्तीचा भंग केल्यास सदरची रक्कम जप्त करुन त्यांचेवर नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात येईल.
14. लिलावधारकाला नदीपात्रातुन / नाल्यातुन / वाळु उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्याक्षेत्रातुन रेती/वाळु उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.
15. लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.
16. लिलावधारकाने रेती / वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतुक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हीशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हीशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी,खनिकर्म निरिक्षक, महसुल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भुविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.
17. लिलावधारकास वाळुची / रेतीची वाहतुक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.
18. वाळुची वाहतुक करतांना वाहनातील वाळु प्लास्टीक पेपरने / ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळुची वाहतुक करणे बंधनकारकआहे. अशी वाहतुक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी.
19. लिलावधारकाने त्याच्या लिलावस्थळातील रेती / वाळुची वाहतुक करणा-या वाहनास त्याच्या वाहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतुक करावी. वाहनक्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळु वाहुन नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपुर्ण वाळु अवैध आहे असे समजुन त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करावी. दंडनिय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात यावी.
20. रेती/वाळुचे उत्खनन करताना अथवा वाहतुक करतांना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.
21. लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतुदी नुसार असलेले नियम (संबंधीत विभागास लागु असलेले नियम) आणि महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमातील तरतुदी नुसार लागु असेलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळुचा पुर्ण उपयोग गौण खनिज म्हणुनच केला पाहीजे.
22. रेतीचे / वाळुचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळुन आल्यास लिलावधारकाने/ठेकेदाराने विभागीय आयुक्त औरंगाबाद/जिल्हाधिकारी परभणी/अपर जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहीजे.

23. अंदाजित परिमाणापैक्षा अधिक वाळुसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास परवानगी देता येणार नाही,
24. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातुन करारात नमुद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाचा सहायानेच वाळुचे/रेतीचे उत्खनन करण्याची तबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळु स्थळात अपेक्षीत साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळु स्थळात पाणी आहे, वाळुगटामधील वाळु मातीमिश्रीत आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळुगट बदलुन दिला जाणार नाही.
25. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणुक. लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिका-याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची राहील वाळू/रेतीच्या धक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळु/ रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाहुचा/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर शासनाच्या मालकीचा होईल, अशा वाळुच्या / रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.
    i. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच १० दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळु / रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतुकीसाठी दुयम वाहतुकपासेस देण्यात येणार नाहीत.

26. शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव/ ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.
27. लिलावधारकाने त्यांना मंजुर केलेल्या वाळुघाटातुन उत्खनन केले आहे, त्याबाबचे विवरणपत्र दर महीण्याच्या १० तारखेला जिल्हाधिकारी यांना सादर करणे सक्तीचे आहे. प्रत्यक्षात अशी विवरणपत्रे लिलावधारकांकडुन सादर केली जात नाहीत, असे आढळुन येत आहे. त्यामुळे जे लिलावधारक मासिक विवरणपत्र विहित वेळेत सादर करणार नाहीत, त्यांच्याविरुध्द ठेका रद्द करण्याबाबत तसेच त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी परभणी यांना असतील.
28. लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातुन रेती / वाळु काढण्याचे धुप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातुन वाळुचे स्वतः उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी अपर जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी यांचा उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय अंतिम राहील.
29. एकदा अत्यूच्च बोली स्विकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत रेती / वाळु उत्खननाचा कालावधी वाढवुन देण्याचा अथवा कोणत्याही कराणास्तव रेतीचा / वाळुचा गट बदलुन देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार नाही. उत्खनन केलेल्या वाळुच्या / रेतीच्या

वाहतुकीसाठी अस्तित्वात असलेले रेस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते बपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/ वाळु उत्खननाचा कालावधी वाढवुन दिला जाणार नाही अथवा रेती/वाळुघाट बदलुन दिला जाणार नाही.

30. अवैध वाळु/रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ मधील नियम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात यावी.

31. लिलावधारकाने/परवानाधारकाने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणा-या वाहनांची माहिति तहसिलदार / जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी.कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

32. अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांनी वाळूची वाहतूक करणा-या ट्रकना एकाच प्रकारचा रंग देणे शक्य आहे का याबाबतची शक्यता तपासून पाहून वाळू वाहतुकीसाठी एकाच प्रकारचा रंग दिलेले ट्रक वापरण्यात येईल या बाबत लिलावधारकांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

33. वाळूचे /रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी / नुकसान पोहचवल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील.अशा हानीची / नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्याबबतचा त्याचा निर्णय अंतीम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

34. लिलावधारकाने/परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळूगटाच्या ठिकाणी फलक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमादर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहीत केलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळु/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे,पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

35. माननीय सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्रं.१९६२८-१६२८/२००९ मध्ये दि.२७/०२/२०१२ रोजी दिलेले तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू/ रेती गटातून जास्तीत जास्त ३ मीटर किंवा पाण्याची पातळी यापैकी जे कमी असेल तितक्या खोलीपर्यंत किंवा पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपर्यंत यापैकी जे कमी असेल तेवढया खोलीपर्यंतच लिलावधारक/ परवानाधारकाला वाळु/रेतीचे उत्खनन करता येईल.

36. नदीपात्रातील वाळू थराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चित करुन बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खननकरता येणार नाही. निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत, तसेच नदीपात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहिरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही या बाबत योग्य ती दक्षता लिलावधारकाने घेणे आवश्यक राहील.

37. लिलावधारकास लिलावात मंजूर केलेल्या वाळुसाठयाइतकेच उत्खनन करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

38. वाळु/रेतीची उत्खनन व वाहतूक सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीतच करता येईल. या कालावधीव्यतिरिक्तच्या काळात केलेले उत्खनन व वाहतूक अवैध समजून कारवाई करण्यात येईल.
39. कोणत्याही रेल्वे पुलाच्या व रस्ते पुलाच्या कोणत्याही बाजूने ६०० मीटर्स (२००० फुट) अंतराच्या आत वाळुचे उत्खनन करता येणार नाही.
40. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग / विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक राहील.
41. सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.
42. खाजगी मालकीच्या जमिनीतून,अशा जमीनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, वाळू / रेती काढता येणार नाही तसेच रस्ते / पायवाट म्हणून वापरण्यत येणा-या जमिनीतून वाळू / रेती काढता येणार नाही.
43. लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळू वाहतेकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळूगटाच्या नजीकाच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळूगटामधून उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये साठवूण विक्री करावी. डेपोपर्यंतच्या वाळू वाहतूकीसाठी ट्रॅक्टर, ट्रॉलीचा वापर करावा. वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज दर आठवडयाला तहसिलदार यांना सादर करावे.
44. वाळु उत्खननासाठी लिलाव किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणेहा एकमवे उद्देश नसून, विकास कामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रातील वाळू साठल्याने आजुबाजुच्या परिसरात पुरसद्श्य परिस्थिती उभ्दवू नये म्हणून वाळुचे उत्खनन केले जाते. लिलावधारकास लिलाव मंजूर केल्यानंतर किंवा परवाना दिल्यानंतर लिलावधारकाने/ परवानाधारकाने वाळूगटाचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून एका आठवडयाच्या आत वाळू/ रेती उत्खननासंदर्भात इतर अटी व शर्ती विवरणपत्रत देण्यात आल्या असून त्या लिलावधारकांवर बंधनकारक असतील.
45. नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळूगटातून वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू/ रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी अशा प्रकारच्या कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही.
46. ग्रामपंचायतीने वाळूच्या अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी लिलावधारकामार्फत लिलावाच्या अटी व शर्तीप्रमाणे उत्खनन होत आहे किंवा कसे, याची पाहणी करणे व अटी व शर्तीचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास तहसिलदार व जिल्हाधिकारी यांना त्यासंबंधीची माहिती देणे आवश्यक राहील.
47. लिलावधारकाकडून वाहतूक करण्यात येणा-या वाळूच्या वाहनासोबतच्या वाहतूक पासची तपासणी संबंधित गावच्या ग्रामसेवक व सरपंच यांना करता येईल. वाहनासोबत पास नसेल किंवा वाहतूक पासमध्ये खाडाखोड असेल दिनांक व वेळ चूकीचा असेल अशा त्रुटी आढळून आल्यास त्याबाबची माहिती त्यांनी तहसिलदार यांना देणे आवश्यक राहील.
48. वाळूगटाचा लिलाव करण्यास ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर वाळूगटाचा लिलाव करण्यात आला.मात्र असे वाळूगट लिलावात न गेल्यास शासनाच्या महसूलाचे नुकसान होऊ नय, तसेच

ग्रामपंचायतीस सुध्दा निधी मिळावा यादृष्टीकोनातून संबंधित ग्रामपंचायतीच्या मागणीनूसार अशा वाळूगटासाठी निश्चित केलेल्या हातच्या किंमतीने जिल्हाधिकारी यांना परवाना देता येतील. ग्रामपंचातीस सदर वाळू विकण्यास अनूमती राहील.

49. वाळु / रेती लिलावाचा कमाल कालावधी एक वर्षाचा राहील व तो सर्वसाधारणपणे दिनांक १ ऑक्टोबर ते पुढील वर्षाच्या ३० सप्टेंबर पर्यंत असेल. लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी लिलावाचा कालावधी वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजीच संपुष्टात येईल.

<u>**मात्र,**</u>

अ) ३००० ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव ३ महिने किंवा ३० सप्टेंबर यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी करण्यात येतील.

ब) ३००० ते ४५०० ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव ४ १/२ महिने किंवा ३० सप्टेंबर यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी करण्यात येतील.

क) ४५०१ ते ६००० ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव ६ महिने किंवा ३० सप्टेंबर यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी करण्यात येतील.

ड) ६००१ ब्रास व त्यावरील परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव दिनांक ३० सप्टेंबर पर्यंतच्या कालावधीकरिता करण्यात येतील.

50. लिलावधारकास वाळूगटाचा ताबा देताना तसेच ताबा परत घेताना तहसिलदार किंवा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्या समक्ष पंचनामा करण्यात यावा. वाळूगटाचे खडडे असल्यास त्याचा उल्लेख पंचनाम्यामध्ये करण्यात येईल. याबाबतचे व्हीडीओ चित्रीकरणही करण्यात येईल.

51. लिलावधारकांनी आपापसात संगनमत केल्यास, ठराविक वाळू घाटांचा लिलाव पुन्हा पुन्हा लावून सुध्दा कोणीही लिलावधारक बोली बोलण्यास पुढे येत नाहीत. व त्यामुळे वाळु घाटाचा लिलाव होऊ शकत नाही. अशा प्रकारे संगनमत करुन शासनाच्या महसूलाचे नुकसान करणा-या तसेच अवैध उत्खनन व वाहतुकीसारखे गुन्हे करणा-या लिलावधारकास संपुर्ण राज्यासाठी काळया यादीत (Black List)टाकण्यात येईल.

52. पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोली पेक्षा जास्त खोल उत्खनन केल्याचे निर्देशनास आल्यास लिलावधारक परवानाधारकांकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येवून लिलाव / परवाना रद्द करण्यात येईल. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

53. अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणामध्ये संबंधित ठेकेदार/ लिलावधारक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

54. प्रचलित नियमानुसार कारवाई करताना संबंधिताविरुध्द भारतीय दंड विधि संहिता कलम ३४,११४,३७९,३९२,३९३,३९४,३९६ इत्यादी कलमांतर्गत गुन्हा दाखल करणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८ (७) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व कलम ४८ (८) मधील तरतुदीनुसार वाळू उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामुग्रीव वाहतूकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळू जप्त करणे इत्यादी कारवाई करण्यात येईल.

55. वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणात वाळूच्या बाजारभावाच्या आधारे दंडाची रक्कम आकारण्यात येईल.

56. वाळूचे अवैध उत्खनन / वाहतुकीच्या अनुषंगाने कारवाई करतांना महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारीविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड हातभट्टीवाले औषधद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ अधिनयमान्वये कारवाई करण्यात येईल.
57. लिलावधारक / परवानाधारक यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण विषयक नियमातील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक असले, सदर तरतुदीचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.
58. प्रत्येक वाळुगटाच्या ठिकाणी २४/७ छायाचित्रण होण्यासाठी लिलावधारकामार्फत CCTV बसविण्यात यावेत. यापैकी किमान एक CCTV कॅमेरा वाहतुकीच्या साधनात ज्या ठिकाणी वाळू भरण्यात येते त्या ठिकाणी बसविण्यात यावा व वाळूगटातील वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरून ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणासाठी वापरण्यात यावा. वाळूगटाच्या ठिकाणी बसविलेल्या CCTV ची किंमत लिलावधारकांना सोसणे आवश्यक राहील.
59. लिलावधारकांनी बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वन विभागाकडे देणे आवश्यक राहील. लिलावधारकाने वाळू उत्खनन व वाहतुकीचे छायाचित्रण असलेली सीडी दर १५ दिवसांनी तहसिलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील.
60. तहसिलदार व उपविभागीय अधिकारी अशा अशा सीडीची तपासणी करतील अशा तपासणीत CCTV कॅमेरा काही काळासाठी बंद असल्याचे निर्देशनास आल्यास, मंजूर साठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध दिवस यानुसार दर दिवशी करावयाचे उत्खनन विचारात घेवून, जेवढे दिवस CCTV कॅमेरा बंद होता, तेवढे दिवस सरासरी उत्खनन केले असे गृहीत धरुन लिलावाच्या रक्कमेनुसार प्रति ब्रास रक्कम परिगणित करुन त्या दराने कॅमेरा बंद असलेल्या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूच्या रक्कमेएवढी दंडात्मक रक्कम लिलावधारकांकडून वसुल करण्यात येईल. एखादया दवशी कितीही कालावधीसाठी CCTV बंद असल्या तरीही पुर्ण दिवसासाठी CCTV बंद असल्याचे समजून वरील प्रमाणे दंडात्मक रक्कमेची आकारणी व वसूली करण्यात येईल.
61. लिलावधारकाने तहसिलदारांनी प्रमाणित करुन दिलेली भेट वही ठेवणे बंधनकारक असेल. सदर भेटवही महसूल अधिकारी / कर्मचारी यांना तपासणी वेळी दाखवणे बंधनकारक रहील.
62. संबंधित मंडळ अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील वाळूगटाची पाहणी करुन त्याची नोंद दैनदिन भेट वहीमध्ये करण्यात येईल. अशी नोंदवही लिलावधारक यांनी संबंधीत मंडळ अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
63. संबंधित तहसिलदार, उपविभागीय अधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील वाळूगटाला वेळोवेळी आकस्मिक भेट देऊन त्याची दैनदिन भेटवहीत नोंद करण्यात येईल.
64. नदीपात्रात पुल असल्यास त्या पुलाच्या आजूबाजूस तसेच बेंच मार्कच्या खाली वाळू उत्खनन केले जाणार नाही.
65. ज्यावेळी लिलाव रद्द करण्यात येईल, त्यावेळी त्या वाळू क्षेत्राचा नव्याने लिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास, फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेरलिलावात

पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

66. लिलाव मंजुरीचे आदेश निर्गमित केल्यानंतर लिलावधारकाने वाळुगटाचा ताबा सात दिवसांच्या आत घेतला पाहीजे, वाळूघाटाचा ताबा घेतांना व्हिडीओ चित्रिकरण करण्यात यावे व त्याची सी.डी.तहसिलदार मार्फत जिल्हाधिकारी यांचेकडे ताबा दिल्याच्या अहवालसोबत जमा करावी. व वाळुगटाचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत उत्खनन सुरु करणे आवश्यक राहील.

67. मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.4830/2010 मधील दिनांक 26.10.2010 च्या निर्णयान्वये ठरवून दिलेल्या निकषानुसार,वाळू गटाशी संबंधित तहसिलदार यांनी उत्खननाचा अहवाल प्रत्येक आठवड्याला अपर जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. तसेच महिण्याच्या दुस-या व चौथ्या रविवारी उत्खननबंद ठेवावे. व उत्खनन बंद असलेल्या दिवशी तहसिलदार यांनी वाळू गटाचे निरीक्षण करावे व त्यांचा अहवाल अपर जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. सबब, लिलावधारकांनी सदर बाबीची नोंद घ्यावी.

68. लिलावधारकास, त्यांच्या मंजुर क्षेत्रातील ज्या ठिकाणातून वाळू काढण्याने जमिनीची धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारा जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतीम असेल.

69. भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाने विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमीनीतून, अशा जमिनी लिलावधारकास देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी त्या ठिकाणाहून वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते पायवाट म्हणुन वापरण्यात येणा-या जमीनीतून वाळू काढता येणार नाही.

70. कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फुट) अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी नाल्यांवर पूल आहेत,त्यांच्या स्तंभापासून 100 मीटर्सपर्यंत रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रामध्ये रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

71. वाळूचे उत्खनन करतांना किंवा ती काढतांना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायीत्व लिलावधारकावर राहील. अशा हानी/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसुलाच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

72. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजुर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. परंतु, लिलावधारकास दिलेल्या अटी व शर्तीचा तसेच शासनाच्या नियमांचा भंग न करताही जर शासनाने लिलावाची मुदत संपण्यापूर्वी काही कालावधीसाठी ठेका रद्द केला, तर त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला असेल त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रक्कम परत करतांना लिलावातील देकाराची रक्कम,

लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानूसार परताव्याच्या रकमेची परीगणना करण्यात येईल.

73. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी केला असेल त्याच जिल्ह्यात करावी लागेल व त्यासाठी अकृषिक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल.सदर ठिकाण नदीपात्रापासून 200 मीटरपेक्षा अधिक अंतरावर नसावे. सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातून जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरित सर्व क्षेत्र अशाप्रकारे बंद करावे लागेल की ज्यामुळे तेथे एकही वाहन आत किंवा बाहेर जाऊ शकणार नाही. यासाठी लाकडी/तारेचे/लोखंडी/ भिंतीचे/दगडाचे कुंपण किंवा मोठमोठी दगडे जी हलविता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदके/चर खोदणे आवश्यक असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळू/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळू/रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू रेती साठा करण्यास परवाना दिला जाणार नाही.

74. लिलावधारकाने निर्धारित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करुन प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळूगटाचे नाव/क्रमांक, वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादि तपशिल नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएस (SMS) निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडून लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनुसार त्यास एसएमएसद्वारे टोकन नंबर प्राप्त होईल.सदर टोकन नंबर बारकोड पावतीवर नमुद करावा लागेल. टोकन नंबर प्राप्त झाल्याशिवाय व ते बारकोड पावतीवर नमुद केल्याशिवाय लिलावधारकास वाळू/रेतीची वाहतूक करता येणार नाही. टोकन नंबरशिवाय व बारकोड पावती शिवाय वाहूतक केल्यास ती अवैध ठरुन त्यावर प्रचलित कायदे व धोरणानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

75. वाळू/रेतीची वाहतूक करणा-या चालकाकडे उक्त टोकन नंबर नसेल किंवा टोकन नंबरचा कालावधी संपलेला असेल तर अशी वाहतूक अवैध ठरेल.

76. वाळू/रेतीची वाहतूक करणा-या वाहन चालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती व टोकन नंबर आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडून नियुक्त भरारी पथकाकडून अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देश करतील अशा व्यक्तींकडून केली जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती व वैध टोकन नंबर आढळली नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,1966 मधील कलम 48(7) व (8), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 आणि शासन निर्णय, दि.03.01.2018 व शासन अधिसुचना दि.12.01.2018 मधील निर्धारित तरतुदीनुसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

77. वाळू/रेती लिलावधारकाने पावतीमध्ये नमुद परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौण खनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार

कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे लिलाव धारकाने दर महिन्याच्या 05 तारखेपर्यंत संबंधीत तहसिलदार यांच्या कडे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी अवल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच अपर जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

78. अंदाजीत परिमाणापेक्षा अधिक वाळुसाठा रेतीगटात असल्यास, त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही. व अंदाजीत परीमाणापेक्षा लिलावधारकास अधिक उत्खनन करता येणार नाही. परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तर नमुद अंदाजीत वाळुसाठयापैकी वाळु कमी भरल्यास त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

79. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे/गोदावरी नदीवरील बंधारेच्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी निश्चीत केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक राहील.

80. लिलावधारकास निश्चित करुन दिलेल्या गटापासून 500 मि. अंतरापर्यंत किंवा घाटावरुन नजरेच्या टप्प्यात येणा-या क्षेत्रात रेतीचे अवैध उत्खनन होत असल्यास लिलावधारकाने तात्काळ संबधीत तहसिलदार यांना लेखी माहिती सादर करावी. असे न केल्यास सदर उत्खनन लिलावधारकानेच केले आहे असे गृहित धरुन दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

81. उत्खननासाठी यांत्रीक साधनांचा वापर केल्यास ते उत्खनन अवैध समजण्यात येईल व अटी / शर्तीनुसार कारवाई करण्यात येईल.

82. लिलावधारकाने जिल्हा परिषद कर/पंचायत कर विहित केल्याप्रमाणे अदा करावा.

83. जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चीत करुन दर्शविण्यात यावी. लिलावधारकाने त्याला मंजुर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारने अनिवार्य राहील व या क्षेत्राचे बाहेर उत्खनन करता येणार नाही. स्वत:चे तसेच सक्षम प्राधीका-यांच्या पुर्व परवानगीने नेमलेल्या त्याच्या उपठेकेदाराचे नाव, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणरा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

84. लिलावात दिलेल्या क्षेत्रातून करारात नमुद केलल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहायानेच वाळूचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षीत साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळु स्थळात पाणी आहे, अशा तसेच मानवी वा नैसर्गीक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधीत कोणत्याही परीस्थीतीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत शासन जमा केलेली वाळूगटाची रक्कम परत केली जाणार नाही.

85. वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केलेले असेल त्या क्षेत्रातून वाळु उत्खनन करतांना नैसर्गीक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

86. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी निकामी वाळूचे साचलेले ढिग नदीपात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

87. लिलावधारकाने सिलटेशन (Siltation) अभ्यासाबाबतचा अहवाल वाळू उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी तज्ञ एजन्सी, जसे NIO/CWPRS मार्फत करुन त्याचा अहवाल पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे सादर करावा लागेल.
88. लिलावधारकाने मंजूर क्षेत्रापैकी कमीत कमी 20 टक्के क्षेत्रामध्ये नदीतीरावर तसेच गावातील वाहतूक रस्त्यावर CPCB Guideline नुसार स्थानीक वन अधिकारी व फलोत्पादन अधिकारी यांचे मदतीने झाडे लावून हरीयाली (Greenbelt) करावी लागेल.
89. लिलावधारकाने कासव प्रजनन क्षेत्रात वाळुचे उत्खनन करु नये.
90. लिलावधारकाने उत्खननाच्या वेळी Soil Erosion व Silt Management बाबत आवश्यक त्या दक्षता घेण्यात याव्यात.
91. लिलावधारकाने उत्खननाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमीक उपचार सुविधा उपलब्ध करुन दयावी.
92. लिलावधारकाने वार्षिक पर्यावरणीय अंकेक्षण अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा.
93. लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कास बाधा पोहचविता कामा नये
94. वाळू उत्खनन करतांना अथवा हलवितांना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलील ठाण्यात तसेच जिल्हाधिकारी कार्यालयास दयावी.
95. लिलावधारकांनी त्यांना मंजूर केलेल्या वाळुगटातून केलेल्या वाळूचे उत्खनन, विक्री व साठा केल्याबाबत दैनंदिन हिशोब ठेवावा. तसेच दर महिन्याच्या 05 तारखेपर्यंत, अगोदरच्या महिन्याचा मासिक अहवाल, जिल्हाधिकारी कार्यालय, खनिकर्म विभाग व तहसिल कार्यालय यांना सादर करावा सलग दोन महिने असा अहवाल प्राप्त न झाल्यास अथवा सादर केलेल्या अहवाल चुकीचा आढळुन आल्यास सदरच्या वाळु घाटाचा लिलाव रद्द करुन शासनची दिशाभुल केल्यामुळे योग्य ती नियमानुसार कार्यवाही अनुसरली जाईल.
96. लिलावधारकाने लिलावाच्या अटी व शर्ती तसेच केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण विभागाकडील दिनांक 24.12.2013 मधील ऑफीस मेमोरँडम तसेच महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 व वाळू निर्गती धोरण, शासन निर्णय दिनांक 03.01.2018, दिनांक 26.12.2014 तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतुदीनुसार लागू असलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याच प्रमाणे वाळुचा पुर्ण उपयोग गौणखनिज म्हणूनच केला पाहिजे. अवैध वाळु उत्खनन/साठा/वाहतुक प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 मधील 48(7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल.
97. वाळुचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने जिल्हाधिकारी, परभणी यांना तात्काळ कळविले पाहीजे.
98. सार्वजनिक पाणवठा/पाणीपुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्राणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.
99. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादीत करुनच वाळूची वाहतुक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतुक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
100. लिलावधारकाने वाळु उत्खनन करतांना होणारे प्रदुषणासंबंधी, प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.

101. मा.न्यायालयाने कोणत्याही वाळुघाटाबाबत काही आदेश/निर्णय दिल्यास,सदर आदेश/निर्णय लिलावधारकावर बंधनकारक राहतील व मा. न्यायालयाचे आदेश/निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

102. शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय लिलावधारकास ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा निविदा उघडुन मंजूर केल्यानंतर भागीदारही घेता येणार नाही.

103. लिलाव झालेल्या वाळू / रेती गटांतून वाळू उत्खननासाठी लिलावधारकास येणा-या अडचणी व विविध व्यक्ती व संस्थाकडून वाळू उत्खननाबात करण्यात येणा-या तक्रारीसंदर्भात चौकशी करुन चौकशीच्या निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील अधिका-यांचा समावेश असलेली समिती राहील

| | | |
|---|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| 2 | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | - सदस्य |
| 3 | सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता | - सदस्य |
| 4 | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे जिल्हयातील किंवा यथास्थिती विभागातील वरीष्ठ अधिकारी | - सदस्य |
| 5 | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अधिकारी | - सदस्य |
| 6 | जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी | - सदस्य सचीव |

(अ) एकदा अत्युच्च बोली स्वीकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात वाळु उत्खनन करण्यास लिलावधारकास काही अडचणी / अडथळे आल्यास त्यांनी याबाबत संबंधित तहसिलदार यांच्याकडे अर्ज सादर करावा. संबंधित तहसिलदार यांनी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या वाळू गटातून उत्खनन करण्यास येणा-या अडचणींची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल उक्त समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर उक्त समिती १५ दिवसांत निर्णण घेईल.

(ब) रेती / वाळू स्थळातून लिलावांच्या अटी / शर्तीचे उल्लंघन करुन वाळुचे उत्खनन होत अवैध / नियमबाहय वाळू उत्खननामुळे नदी काठया गावातील पिण्याचाव शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होतो. वाळूच्या वाहतूकीमुळे नदी काठच्या शेतीची / रस्त्यांची हानी होते. अशा स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थाकडून प्राप्त झाल्यास अशा तक्रारीची तहसिलदार यांनी चौकशी करुन त्या बाबतचा अहवाल उक्त समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर उक्त समिती १५ दिवसात निर्णय घेईल.

(क) लिलावधारकास वाळू उत्खनन करण्यास होणा-या स्थानिक विरोधामुळे किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील व नैसर्गिक सबल कारणामुळे वाळूचे उत्खनन करता येत नसल्यास लिलावधारकाने त्वरील जिल्हास्तरीय समितीसमोर अर्ज करावा. या प्रमाणे लेखी अर्ज प्राप्त झाल्यास, सदर समिती अशा वाळू / रेती स्थळाना प्रत्यक्ष भेट देऊन त्या वाळे / रेती स्थळाचे पुनश्च सर्वेक्षण करावे. तसेच तक्रारीतील अन्य मुद्याबाबत स्थानिक चौकशी करावी व समितीच्या बैठकीत त्यावर विचार विनिमय

करुन,संबंधित वाळू / रेती गटातून वाळूचे उत्खनन चालू ठेवण्याविषयी किंवा ते बंद करण्याबाबत १५ दिवसांत उचित निर्णय घ्यावा वतो निर्णय संबंधीत लिलावधारक, तक्रारदार व क्षेत्रीय महसूल अधिका-यांना कळवील. या बाबत जिल्हास्तरीय समिती सवेक्षणाच्या वेळी व्हीडीओ चित्रीकरण करील.

(ड) ज्या तक्रारदारास समितीच्या अध्यक्षांचा निर्णय मान्य नसेल अशा तक्रारदाराला याबाबत मा.विभागीय आयुक्त यांचेकडे अपील करता येईल. मा.विभागीय आयुक्त जिल्हास्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करुन कोणत्याही परीस्थितीत १५ दिवसांत उचित निर्णय घेतील. सदर निर्णय संबंधीत तक्रारदार व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल.

(इ)वरीलप्रमाणे वाळू उत्खननासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर समितीने चौकशी करुन ज्या वाळूगटातील वाळूचे उत्खनन बंद करण्याविषयी निर्णय घेतला असेल, अशावेळी लिलावधारकासोबत करण्यात आलेला करारनामा तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच संबंधित लिलावधारक यांना लिलावाची रक्कम अथवा यथास्थिती उत्खनन न करता आलेल्या वाळूची रक्कम परत करण्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(ई) लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत ठेका रद्द केल्यास किंवा लिलावधारकास वाळू / रेती उत्खनन करण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरणा येणार नाही.

104 .नदीपात्रातील काही वाळू गटांचा लिलाव करण्यास व्यापक विरोध झाल्यास अशा वाळू स्थळांच्या संदर्भात अंतीम निर्णय घेण्यासाठी महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनी-10/0610/प्र.क्र.281/ख,दिनांक 26.05.2011 अन्वये गठीत केलेली मंत्री मंडळाची उपसमिती निर्णय घेईल.

105. <u>लिलावाची रक्कम परत करण्यासंबंधीची कार्यपध्दतीः-</u>

(अ)वाळुगटाचा यशस्वीरित्या लिलाव झाल्यानंतर लिलावधारकाने लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधीत रक्कमा शासनजमा केल्यानंतर संबंधीत लिलावधारक यांना काही अपरिहार्य कारणास्तव वाळुगटाचा ताबा देणे शक्य नसेल/होत नसेल अशा प्रकरणांत जिल्हास्तरीय समितीने गरज असल्यास स्थळ पहाणी करुन, वाळुगटाचा ताबा देणे शक्य नाही, असा अहवाल शिफारशीसह शासनास सादर केल्यास लिलावाची संपुर्ण रक्कम परत करण्याबाबत विचार करता येईल.

(ब) लिलावधारक यांनी लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधीत रक्कमा शासनजमा केल्या असतील आणि कोणत्याही न्यायालयीन आदेशाने किंवा शासनाच्या तसेच वरीष्ठ प्राधिकरणाच्या आदेशाने वाळु उत्खननास स्थगिती देण्यात आली असेल, अशा प्रकरणांत. ज्या कालावधीत स्थगिती देण्यात आली आहे, त्या कालावधीच्या प्रमाणात लिलावाची प्रमाणशीर रक्कम परत करण्याबाबत विचार करता येईल.

(क) अन्य कोणत्याही कारणास्तव वाळु उत्खनन करणे शक्य झाले नसेल/होत नसेल (उदा.ग्रामस्थाचा विरोध,प्रशासकीय यंत्रणांचा विरोध) अशा प्रकरणांत जिल्हास्तरीय समितीने प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन, लिलावधारक तसेच ग्रामस्थांनी दिलेल्या करणांची खातरजमा करुन, संबंधीत वाळुगटातुन वाळुचे उत्खनन करणे शक्य आहे किंवा कसे, याबाबत सुस्पष्ट शिफारशीसह अभिप्राय

जिल्हाधिकारी यांना सादर करील. जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीने वाळु उत्खनन न करता येण्याबाबत दिलेल्या कारणांची तपासणी करुन, सदर कारणे समर्पक असल्यास लिलावस्थळाचा ताबा परत घ्यावा व संबंधीत लिलावधारक यांना लिलावाची रक्कम/प्रमाणशीर रक्कमपरत करण्यासंबंधीचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव शिफारशीसह विभागीय आयुक्त यांच्यामार्फत शासनास सादर करण्यात येईल.

106. <u>लिलावाची प्रमाणशीर रक्कम परत करण्याकामी परिगणनाः-</u>

(अ) लिलावाची देकराची रक्कम व लिलावातील अंदाजीत वाळुसाठा यानूसार वाळूची प्रतीब्रास किंमत परिगणीत करण्यात येईल.

(ब) लिलावातील अंदाजीत वाळुसाठा व वाळु उत्खननासाठी उपलब्ध कालावधी यानुसार दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळुचे सरासरी परिमाण निश्चित करण्यात यावे. लिलावधारकास ज्या कालावधीसाठी वाळु उत्खनन स्थगित/बंद ठेवावे लागते तो कालावधी व दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळुचे सरासरी परिमाण यानुसार स्थगिती/बंद कालावधीमध्ये उत्खनन करता येऊ शकलेला वाळुसाठा निश्चित करण्यात येईल.

(क) वरील क्रमांक (ब) नुसार निश्चित केलेला वाळुसाठा व प्रत्यक्षात उत्खनन न करता आलेला वाळुसाठा यापैकी जो कमी असेल, तेवढया वाळुसाठी वरील क्रमांक (अ) येथील प्रतीब्रास दरानुसार लिलावधारकास देय रकमेची परिगणना करण्यात येईल.

107. <u>लिलावाची रक्कम परत मिळविण्यासाठी अर्ज करण्याची कालमर्यादाः-</u>

लिलावधाराकास लिलावाच्या कालावधीत वरीलपैकी कोणत्याही कारणास्तव वाळु उत्खनन करणे अशक्य असल्यास जास्तीत जास्त संबंधीत वर्षाच्या डिसेंबर अखेरपर्यंत लिलावधारक यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे लिलावाची रक्कम / प्रमाणशीर रक्कम परत मिळण्यासाठी अर्ज सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर करण्यात आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

108. <u>खालील कारणास्तव लिलावाची रक्कम पतर करण्यात येणार नाहीः-</u>

वाळु/रेती निर्गती धोरणातील अटी व शर्ती तसेच निविदा सुचनेतील अटी व शर्तीनुसार लिलावात भाग घेण्यापुर्वी, वाळुस्थळात अपेक्षित वाळुसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहाय्याने वाळुचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची आहे. त्यामुळे वाळुस्तळात अपेक्षित वाळुसाठा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध नाहीत, वाळुगटात पाणी आहे, मातीमिश्रीत वाळु आहे, वाळु उत्खननासाठी सक्शन पंपाची परवानगी मिळाली नाही अशा कारणास्तव लिलावाच्या रक्कमेचा परतावा अनुज्ञेय असणार नाही.

109. लिलावधारकाने त्यांना मंजूर केलेल्या क्षेत्रामधील/क्षेत्रालगतच्या वन्य प्राण्यांचे/पक्षांचे अस्तीत्वास तसेच त्यांच्या निवासास इजा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.

110. लिलावधारकाने वाळु उत्खनन करतांना मा.सर्वोच्च न्यायालय तसेच नॅशनल ग्रीन ट्रीब्युनल यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

111. लिलावधारकाने नदीचा प्रवाह,गती,गढूळता यांच्या स्वरुपात बदल होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच वाळुचे उत्खनन करतांना नदीतील मातीच्या गुणधर्मांवर परीणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

112. वाळु वाहतुक करणारी वाहने रहिवासी भागात उभी करु नयेत. तसेच लिलावधारकाने कामगारांसाठी निवासाची सोय, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुवीधा उपलब्ध करुन दिली पाहीजे.

113. वाळुची वाहतुक करणा-या वाहनांचे सक्षम प्राधीकरणाने दिलेले Pollution Under Controll प्रमाणपत्र वाहनासोबत बाळगणे आवश्यक आहे.

114. लिलावधारकाने वाळु उत्खनन करीत असतांना पाण्याचा उपसा करणे आवश्यक असल्यास त्यासाठी संबंधीत विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

115. लिलावधारकाने वाळु उत्खननामुळे खराब झालेल्या पाण्यावर Moef/ MPCB च्या तरतुदीनुसार प्रक्रीया करावी.

116. लिलावधारकाने मंजुर क्षेत्रातील Ambient Air Quality Monitoring माहे जानेवारी, एप्रिल, नोव्हेंबर, महिन्यात करावी.

117. लिलावधारकाने CPCB च्या नियमानुसार Noise Level Controling करावे.

118. लिलावधारकाने त्यांच्या मंजूर संपुर्ण क्षेत्रावर प्रकाश पडेल अशा रितीने लाईटची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच संपुर्ण क्षेत्र दिसेल अशा पध्दतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवुन सदर कॅमे-याचे फुटेज मासीक अहवाला सोबत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

119. लिलावधारकाने वन्यजीव आवास क्षेत्रासंबंधीच्या नियमांचे उल्लंघन करु नये.

120. लिलावधारकाने त्यांना मंजुर क्षेत्रात जाण्या येण्यासाठी एकच मार्ग/रस्ता ठेऊन इतर सर्व मार्ग/छोटे रस्ते इ. बॅरीकेडसने बंद करावेत.

121. लिलावधारकाने त्यांच्या लिलाव क्षेत्रात येणा-या प्रत्येक वाहनांची नोंदणी संबंधीत तहसिलदार यांचेकडे करावी.

122. वाळुचे अनाधिकृत उत्खनन व वाहतुक टाळणेसाठी जिल्हा प्रशासनामार्फत वेळोवेळी देण्यात येणारे निर्देशाचे पालन लिलावधारकास करणे बंधनकारक राहील.

123. दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

124. शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

125. "ई" निविदा, "ई" ऑक्शनमध्ये भाग घेणा-या सर्व व्यक्ती/संस्थेस महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभागाकडील सर्व अटी/शर्ती बंधनकारक राहतील.

126. शासनाने दिनांक 16.10.2015 च्या परिपत्रकान्वये कळविल्यानुसार ज्यांना वाळु लिलाव मंजुर होईल त्यांचेकडुन लिलावाची सर्व रक्कम शासन जमा केल्यानंतर लिलाव धारकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्गकरण्याचा प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीस/शासनास सादर करण्यात येईल.

127. वाळुचे अनाधिकृत उत्खनन व वाहतुक टाळण्यासाठी केंद्र शासन /राज्य शासन / जिल्हा प्रशासनामार्फत वेळोवेळी देण्यात येणारे निर्देशांचे पालन लिलावधारकास करणे बंधनकारक राहील.

128. लिलाव धारक यांना संबंधीत लिलावाची मुदत संपन्याच्या शेवटच्या 15 दिवसात पावती पुस्तक दिले जाणार नाही. या मुळे आवश्यक असलेल्या पावत्यांची मागणी त्या पुर्वीच करुन ते घेण्यात यावीत.

129. लिलाव धारकास त्यांच्या नावाने लिलाव अंतीम झाल्यास 100 रु. च्या स्टँप पेपर वर वाळु लिलावाबाबतच्या अटी व शर्ती पालन करणे बाबत करारनामा/शपथपत्र देणे बंधनकारक राहील.

130. ई-निवीदा/ई-ऑक्शन मधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे, ई-निवीदा/ई-ऑक्शन प्रक्रीयेत वेळेवर निर्णय घेण्याचे तसेच ई-निवीदा/ई-ऑक्शन मधील सर्वोच्च किंमत स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी,परभणी यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

131. लिलावधारकांने निवीदा अधिसूचना, सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी,शर्ती पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करुन घेतल्या नंतर पात्र लिलावधारकास वाळू गटाचा ताबा देण्यात येईल.

132. दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

133. जिल्हास्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन समिती (DEIAA) यांनी प्रदान केलेल्या पर्यावरण अनुमतीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती लिलावधारकावर बंधनकारक राहतील. तसेच शासन निर्णय 16 ऑक्टोबर 2015 नुसार पर्यावरण विषयक अनुमती लिलावधारकाने घेणे आवश्यक राहील व त्यांनी दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे लिलावधारकास बंधंनकारक राहील.

134. मा.राष्ट्रीय हरीत न्यायाधिकारण, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या मुळ अर्ज क्र.363/2015 व 366/2015 ते 368/2015 मधील मा.राष्ट्रीय हरित न्यायाधीकरण नवी दिल्ली यांनी दि.19/01/2017 रोजी दिलेल्या आदेशामध्ये मा.न्यायाधीकरणाच्या पुर्व मान्यतेशिवाय सक्शनपंपाद्वारे वाळू उत्खननास परवानगी देण्यास राज्य शासनास प्रतिबंध केलेला आहे.

135. शासन अधिसुचना, महसूल व वन विभाग, असाधारण क्र.18 दि.12 जानेवारी 2018 मधील तरतूदी नुसार अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतकीवर कारवाई करण्यात येईल.

136. याशिवाय शासन निर्णय क्र गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८९/ख दि ३ जानेवारी २०१८ मधील अटी व शर्ती लिलावधारकावर बंधनकारक राहतील. याशिवाय शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश / निर्देश बंधनकारक राहतील.

(पि.शिव.शंकर)

**जिल्हाधिकारी परभणी**

**रेतीघाट ई निविदा/ई ऑक्शन धारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये 100/- चे मुद्रांकित स्टॅम पेपरवर दोन साक्षीदारांसह द्यावयाचे प्रतिज्ञापत्र**

**<u>शपथपत्र</u>**

मी, (पूर्ण नाव) ------------------------------------------------------------------------------------------------

राहणार(पोस्टाचा पूर्ण पत्ता द्यावा) ------------------------------------------------------------------------

ता. ---------------------------------------- जिल्हा ---------------------------------------------------------------

माझे/माझ्या संस्थेचे पॅन क्रमांक------------------ GST नं. ------------------------------------------------

मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, मी मौजे . . . . . .  . . . ता. . . . . . . . येथील वर्ष 2017-18 साठीच्या रेती लिलावाच्या अनुषंगाने स्थानिक वर्तमानपत्रात . . . . . . . . . वेबसाईटवर प्रसिध्द झालेल्या ई निविदेतील सर्व अटी व शर्तीची माहिती करुन घेतली आहे व मी निविदेत प्रस्तावित केलेल्या किंमतीत उक्त रेती घाट घेण्यास इच्छूक असून त्याची 25% रक्कम रु. . . . शासन जमा करीत आहे.

मला सदर रेती घाट मंजूर झाल्यास, लगेच भरणे आवश्यक असलेल्या लिलावातील सर्वोच्च बोलीच्या 25% रक्कमेपैकी वर नमुद EMD वजा जाता शिल्लक राहणारी रक्कम लिलाव मिळताच मी भरेल. लिलावात मंजूर करण्यात आलेल्या रु. . . . . किंमतीच्या उर्वरित 75% रक्कम मी 15 दिवसांच्या आत चालानद्वारे शासन जमा करुन मंजूर रेती घाटाचे निष्पादन करुन घेण्याची हमी देत आहे. सदरची रक्कम मुदतीत भरण्यास मी कसूरदार ठरल्यास मी जमा केलेली 25% रक्कम रु. . . . . . शासन जमा करण्यास माझी हरकत नाही.

तसेच नियमानुसार फेर निविदेद्वारे दुस-या निविदा धारकास सदरचा रेती घाट मंजूर केल्यास माझी काही हरकत राहणार नाही. फेर निविदेद्वारे शासनाच्या महसुलाचे काही नुकसान झाल्यास, सदर नुकसानीची भरपाई जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यास मी संमती देत आहे.

फेर निविदेत पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या लिलावाच्या रक्कमेपेक्षा अधिकची रक्कम आल्यास आधीकच्या रक्कमेवर माझा काहीही अधिकार राहणार नाही.

मी असेही घोषित करतो की, सदरहू रेती घाट आणि रेती घाटास जाणारे पोच/गाव रस्ते इत्यादिची मी पाहणी केली आहे,त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती वाहतुकीसाच्या योग्यतेबाबत मी भविष्यात कोणताही आक्षेप/वाद उपस्थित करणार नाही.

ठिकाण -----------------

दिनांक ------------------

(                                        )

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

1. पूर्ण नाव ---------------------------------------------- स्वाक्षरी ----------------

   पत्ता ------------------------------------------------------------------------------

2. पूर्ण नाव ---------------------------------------------- स्वाक्षरी -----------------

   पत्ता------------------------------------------------------------------------------

# परभणी जिल्हा रेतीलिलाव सन 2017-18 मध्ये होणा-या रेती ई टेंडरींग/ई-ऑक्शन घाटांचा तपशिल

| अ.क्र. | रेतीस्थळाचे नाव | तालुका | नदीचे नाव | गट क्र. | लांबी (मि) | रुंदी (मि) | GSDA यांनी दिलेली उत्खनना योग्य खोली (मि) | क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये) | उपलब्ध साठा (ब्रास मध्ये) | सरकारी किंमत रु | अनामत रक्कम रु | निविदा शुल्क | फेरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | |
| 1 | अंगलगांव | परभणी | गोदावरी | 288, 289, 290, 291, 292, 293, 294, 295, 304, 305, 306, 307 | 200 | 50 | 0.50 | 1.00 | 1767 | 5401719 | 1080344 | 5000 | दुसरी फेरी |
| 2 | धसाडी | परभणी | गोदावरी | 338, 339, 340, 398, 399, 400 | 200 | 50 | 0.50 | 1.00 | 1767 | 5401719 | 1080344 | 5000 | दुसरी फेरी |
| 3 | कळगांव | पुर्णा | गोदावरी | 1, 2, 3, 4, 5 | 350 | 70 | 1.00 | 2.45 | 8657 | 5774219 | 1154844 | 5000 | दुसरी फेरी |
| 4 | बानेगांव | पुर्णा | गोदावरी | 2, 3 | 400 | 30 | 0.50 | 1.20 | 2120 | 1494600 | 300000 | 5000 | दुसरी फेरी |
| 5 | कंठेश्वर | पुर्णा | पुर्णा | 71,72,73,74,78,79,80 | 420 | 45 | 1.00 | 1.89 | 6678 | 4414158 | 882832 | 5000 | दुसरी फेरी |
| 6 | धानोरा काळे | पुर्णा | गोदावरी | 33, 26, 25, 24, 44, 56, 545, 446 | 400 | 75 | 1.00 | 3.00 | 10601 | 7070867 | 1414173 | 5000 | दुसरी फेरी |
| 7 | गोळेगांव | पुर्णा | गोदावरी | 31, 32, 38, 42, 48,367,389 | 300 | 45 | 1.00 | 1.35 | 4770 | 3181590 | 636318 | 5000 | दुसरी फेरी |
| 8 | मुंबर | पुर्णा | गोदावरी | 235, 277, 279, 281, 282 | 300 | 45 | 1.00 | 1.35 | 4770 | 3181590 | 636318 | 5000 | दुसरी फेरी |
| 9 | वझुर | पुर्णा | गोदावरी | 228, 232, 236, 242, 243, 246, | 400 | 120 | 1.00 | 4.80 | 16961 | 11312987 | 2262597 | 5000 | दुसरी फेरी |
| 10 | कानडखेड | पुर्णा | पुर्णा | 329,330 | 220 | 45 | 0.50 | 0.99 | 1749 | 1021416 | 300000 | 5000 | पहिली फेरी |
| 11 | मीठापुर | पुर्णा | गोदावरी | 15,16,17,18,19 | 350 | 55 | 0.50 | 1.92 | 3401 | 6444895 | 1288979 | 5000 | पहिली फेरी |
| 12 | पिंपळगांव बाळापुर | पुर्णा | पुर्णा | 144,145,146,134,109,143 | 300 | 55 | 0.50 | 1.65 | 2915 | 1714020 | 342804 | 5000 | पहिली फेरी |
| 13 | कान्हेगांव | पुर्णा | पुर्णा | 10,11,12,13,14,15 | 300 | 30 | 0.50 | 0.9 | 1590 | 3013050 | 602610 | 5000 | पहिली फेरी |

| अ.क्र. | रेतीस्थळाचे नाव | तालुका | नदीचे नाव | गट क्र. | लांबी (मि) | रुंदी (मि) | GSDA यांनी दिलेली उत्खनना योग्य खोली (मि) | क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये) | उपलब्ध साठा (ब्रास मध्ये) | सरकारी किंमत रु | अनामत रक्कम रु | निविदा शुल्क | फेरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | |
| 14 | गौडगांव | गंगाखेड | गोदावरी | 55, 56, 57, 58, 59, 61 | 350 | 32 | 0.50 | 1.12 | 1979 | 6049803 | 1209961 | 5000 | दुसरी फेरी |
| 15 | भांबरवाडी | गंगाखेड | गोदावरी | 92, 93, 94, 98 | 300 | 60 | 0.50 | 1.80 | 3180 | 10586220 | 2117244 | 5000 | दुसरी फेरी |
| 16 | दुसलगांव-१ | गंगाखेड | गोदावरी | 3, 2, 1, 49, 47, 46 | 300 | 35 | 0.50 | 1.05 | 1855 | 6175295 | 1235059 | 5000 | दुसरी फेरी |
| 17 | दुसलागांव | गंगाखेड | गोदावरी | 35,34,33,29 | 457 | 35 | 0.50 | 1.59 | 2826 | 8181270 | 1636254 | 5000 | पहिली फेरी |
| 18 | लोहीग्राम | सोनपेठ | गोदावरी | 49, 50, 51, 52, 56 | 400 | 90 | 0.50 | 3.60 | 6360 | 20218440 | 4043688 | 5000 | दुसरी फेरी |
| 19 | दुधगाव | सोनपेठ | गोदावरी | 1, 2, 3, 4 | 250 | 150 | 0.50 | 3.75 | 6625 | 20252625 | 4050525 | 5000 | दुसरी फेरी |
| 20 | वाडी पिंपळगांव | सोनपेठ | गोदावरी | 1,4,5,12 | 300 | 30 | 0.50 | 0.90 | 1590 | 3013050 | 602610 | 5000 | पहिली फेरी |
| 21 | लासीना | सोनपेठ | गोदावरी | 1.5,6,7,8 | 400 | 30 | 0.50 | 1.20 | 2120 | 4017400 | 803480 | 5000 | पहिली फेरी |
| 22 | रहाटी-१ | पालम | गोदावरी | 3, 4, 5 | 300 | 30 | 0.50 | 0.90 | 1590 | 4860630 | 972126 | 5000 | दुसरी फेरी |
| 23 | गुंज-१ | पालम | गोदावरी | 1, 2, 3, 4, 5, 6 | 300 | 40 | 0.50 | 1.20 | 2120 | 5685840 | 1137168 | 5000 | दुसरी फेरी |
| 24 | सोन्ना | सेलू | दुधना | 155, 156, 157, 158, 162, 164 | 440 | 50 | 0.50 | 2.20 | 3887 | 8963422 | 1792684 | 5000 | दुसरी फेरी |
| 25 | खादगांव | सेलू | दुधना | 23 | 100 | 30 | 0.50 | 0.30 | 530 | 1341430 | 300000 | 5000 | पहिली फेरी |
| 26 | शिराळा | सेलू | दुधना | 29,22 | 150 | 25 | 0.50 | 0.37 | 663 | 1678053 | 335611 | 5000 | पहिली फेरी |
| 27 | डाकुपिंपरी | पाथरी | गोदावरी | 75, 76, 77, 78, 81, 82, 92, 96, 103 | 800 | 60 | 0.50 | 4.80 | 8481 | 19184022 | 3836804 | 5000 | दुसरी फेरी |
| 28 | लिंबा | पाथरी | गोदावरी | 1, 2 | 600 | 50 | 0.50 | 3.00 | 5300 | 28609400 | 5721880 | 5000 | दुसरी फेरी |
| 29 | तारुगव्हाण | पाथरी | गोदावरी | 3, 9, 10, 11 | 400 | 50 | 0.50 | 2.00 | 3533 | 3823788 | 764758 | 5000 | पहिली फेरी |
| 30 | डिग्रस | जिंतूर | पुर्णा | 10,11 | 300 | 30 | 0.50 | 0.90 | 1590 | 2008700 | 401740 | 5000 | पहिली फेरी |

# परभणी-हिगोंली संयुक्त रेतीस्थळाचा तपशिल

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>रेतीस्थळाचे नाव</th><th>तालुका</th><th>नदीचे नाव</th><th>गट क्र.</th><th>लांबी (मि)</th><th>रुंदी (मि)</th><th>GSDA यांनी दिलेली उत्खनना योग्य खोली (मि)</th><th>क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये)</th><th>उपलब्ध साठा (ब्रास मध्ये)</th><th>सरकारी किंमत रु</th><th>अनामत रक्कम रु</th><th>निविदा शुल्क</th><th></th></tr>
<tr><td>1</td><td>2</td><td>3</td><td>4</td><td>5</td><td>8</td><td>9</td><td>10</td><td>11</td><td>12</td><td>13</td><td>14</td><td>15</td><td></td></tr>
<tr><td rowspan="2">31</td><td>निलज</td><td>ता.जिंतूर<br>जि.परभणी</td><td rowspan="2">पुर्णा</td><td>16, 18, 19, 20, 22, 25</td><td>500</td><td>60</td><td>0.50</td><td>3</td><td>5300</td><td>18369800</td><td rowspan="2"></td><td rowspan="2"></td><td rowspan="2">दुसरी फेरी</td></tr>
<tr><td>ब्रम्हवाडी</td><td>ता.सेनगाव<br>जि.हिंगोली</td><td>143,141,135</td><td>100</td><td>34</td><td>0.50</td><td>0.34</td><td>600</td><td>2079600</td></tr>
<tr><td colspan="9"></td><td>5900</td><td>20449400</td><td>4089880</td><td>5000</td><td></td></tr>
<tr><td rowspan="4">32</td><td>वझर बु.-1</td><td>ता.जिंतूर<br>जि.परभणी</td><td rowspan="4">पुर्णा</td><td>466, 469, 470, 472, 480, 482</td><td>250</td><td>50</td><td>0.50</td><td>1.25</td><td>2208</td><td>5078400</td><td rowspan="4"></td><td rowspan="4"></td><td rowspan="4">दुसरी फेरी</td></tr>
<tr><td>वझर बु-2</td><td>ता.जिंतूर<br>जि.परभणी</td><td>673, 677, 674, 678, 681</td><td>250</td><td>50</td><td>0.50</td><td>1.25</td><td>2208</td><td>5078400</td></tr>
<tr><td>बन</td><td>ता.सेनगाव<br>जि.हिंगोली</td><td>393 , 372 , 364 , 253 , 142 , 153 , 152 .</td><td>143</td><td>33</td><td>0.30</td><td>0.47</td><td>500</td><td>1150000</td></tr>
<tr><td>वझर खु.-</td><td>ता.सेनगाव<br>जि.हिंगोली</td><td>173 , 172, 171 , 166 , 165, 162, 161, 188 , 351 , 157 , 155 , 153, 129 , 128 ,127.</td><td>139</td><td>34</td><td>0.30</td><td>0.47</td><td>500</td><td>1150000</td></tr>
<tr><td colspan="9"></td><td>5416</td><td>12456800</td><td>2561360</td><td>5000</td><td></td></tr>
</table>

**दि. 28 फेब्रुवारी 2018** **जिल्हाधिकारी परभणी**